**Estd 1962**

**Naac 'A++' Grade**

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ५/१०/२०२१

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील मार्च/एप्रिल २०२१ च्या परीक्षा दि.१० ऑगस्ट २०२१ पासून ऑनलाईन पध्दतीने सुरळीतपणे सुरु झाल्या असून आजपासून पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या परीक्षांना प्रारंभ झाला. आज दि.५ ऑक्टोबर २०२१ रोजी एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी, एम.एस.डब्ल्यू, एम.सी.ए. इ. अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या परीक्षा तसेच काही तांत्रिक कारणास्तव विद्यापीठाच्या परीक्षा न देवू शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी त्यांची पुनर्रपरीक्षा दि. १६ सप्टेंबर २०२१ पासून सुरु झाल्या आहेत. आज दि. ५ ऑक्टोबर २०२१ रोजी बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम. या अभ्यासक्रमाच्या पुनर्रपरीक्षा सुरळीतपणे पार पडल्या.

आजच्या परीक्षेसाठी १७५५ विद्यार्थ्यापैकी १६०६ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने परीक्षा दिली. ऑनलाईन परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना काही तांत्रिक अडचण उद्‌भवू नये यासाठी तांत्रिक अडचणीचे निराकरण करणेसाठी परीक्षा विभागातील अधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच सॉफ्टवेअर पुरवठादार कंपनीची यंत्रणा कार्यरत ठेवण्यात आली होती.

**आज दि.५ ऑक्टोबर २०२१ रोजी खालील एकुण ०६ परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले व आजपर्यंत एकुण ३७१ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.**

| | | | |
|---|---|---|---|
| **१** | **बी.एस्सी. — कॉम्प्युटर सायन्स — सेमि. ३ व ४** | **२** | **बी.व्होक. शुगर टेक — सेमि.— १ व २** |
| **३** | **बी.व्होक. हॉरीकल्चर सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी — सेमि.— १ व २** | | |

अद्याप ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा सुरु झालेली नाही त्यांनी मॉक टेस्ट सत्वर द्यावी म्हणजे मुख्य परीक्षेत तांत्रिक अडचणी येणार नाहीत.

तसेच शैक्षणिक वर्ष सन २०२१—२२ मधील एम.फिल. व पीएच.डी. प्रवेश परीक्षा दि.२०, २१ व २२ ऑक्टोबर २०२१ रोजी ऑफलाईन पध्दतीने आयोजित करण्यात आली असून सदर परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे. सदर वेळापत्रकामध्ये काही आक्षेप/त्रुटी असल्यास त्याबाबत दि.७ ऑक्टोबर २०२१ रोजी सायं.६.०० वाजेपर्यंत appointment.a@unishivaji.ac.in या ईमेलवर पाठविण्यात यावे, दि.७ ऑक्टोबर २०२१ नंतर आलेली कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक श्री.गजानन पळसे यांनी दिली.